MHRG140004592018

## निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश

(पारीत दिनांक १७ ऑगस्ट २०२१)

**०१.** प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुद्ध निरंतर ताकिदीसाठी व ठरावासाठी केला असून प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ०१ व ०२ नुसार प्रतिवादी विरुध्द तात्पुरता मनाई हुकुम मंजूर करणेसाठी दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जाची थोडक्यात पार्श्वभूमी अशी आहे की, वादी यांची चिर्ले गावठाण घर नं. १९८१ ही निवासी मिळकत आहे त्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ५३. ५३१६ चौ. मीटर इतके आहे. सदरची मिळकत ग्रुप ग्रामपंचायत चिर्ले येथे असून या मिळकतीच्या पुर्वेस १२.११९२ चौ.मी. व पश्चिमेश ४६.९७७६ चौ.मी. व दक्षिणेस १११.१९९९ चौ.मी. उत्तरेस २०.६४३२ चौ.मी. जागा मोकळी आहे. सभोवताच्या मोकळया जागेचे व घराच्या बाधंकामचे एकुण क्षेत्रफळ सुमारे २४९.५४०८ चौ.मी इतके आहे. व ही मिळकत या दावाचा विषय आहे. वादी पुढे असे कथन करतात की, सदरची मिळकत ही वादीची वडिलोपार्जित मिळकत आहे. या ठिकाणी पूर्वी बेडा होता. व नोव्हेंबर २०११ मध्ये वादीने त्या बेडयाच्या ठिकाणी घर बांधले आहे. सदरचे घर ग्रुप ग्रामपंचयात चिर्ले यांच्या हददीत आहे. त्याला ग्रामपंचयातीने पाणीपुरवठा केला आहे. व विद्युत कंपनीने विजपुरवठा केला आहे. वादी पुढे असे कथन करतात की, दावा मिळकतीच्या दक्षिणेला रायगड जिल्हा परिषदेची शाळा आहे. व त्या ठिकाणी नविन शाळेचे

बांधकाम सुरू केले आहे. व त्या शाळेच्या कुंपनाला लागून असलेल्या ३० फुट लांब व ५ फुट रुंदीची मोकळी पट्टी वादी कडून प्रतिवादीने शाळेकरीता मागितली होती. आणि जर सदरची मोकळी जागा प्रतिवादी ना दिली नाही तर ते वादीला घरातून बाहेर काढून टाकतील अशी धमकी दिली. त्यामुळे वादींनी सदरचा दावा दाखल केला आहे. व दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यत तुर्तातुत मनाई अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

**०३.** प्रतिवादी या प्रकरणात हजर झाले व त्यांनी निशाणी क्रमांक १३ वर त्यांचा लेखी जबाब दाखल केला आहे. प्रतिवादीच्या मते सदरचा वादीचा दावा हा पूर्णपणे लबाडीचा असून अर्जातील संपूर्ण मजकूर त्यांना नाकारला आहे. प्रतिवादी च्या मते दावा मिळकत ही चिर्ले गावातील शासकीय जागा असून तिचा वापर चिर्ले गावातील नागरीक होळीच्या सणाकरीता दरवर्षी या जागेचा वापर करीत होते. आणि सदरच्या जागेवर वादीने अतिक्रमण केले आहे व सदरची जागा हडपण्याचा प्रयत्न केला आहे. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीची मालकी दर्शविणारा ७/१२ उतारा अथवा गाव नमुना ६ गाव नमुना ८ अ दाखल केलेला नाही. दि. ११/०९/२००८ रोजी शासकीय जमिनीमधील अतिक्रमण दुर करण्याची नोटीस वादीची आई श्रीमती शकुतंला दुकल्या मढवी यांना ग्रामपंचायत चिर्ले दिली होती. परंतु आज पर्यत वादीनी त्यांच्या मालकी बाबतचा कागदोपत्री पुरावा ग्रामपंचयातीकडे दिला नाही. वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा तोल प्रतिवादीच्या बाजूने आहे. मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीचेच अतोनात नुकसान होणार आहे. तरी वादीचा मनाई हुकुमाचा अर्ज खारीज करावा.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्यातील वरील परस्पर विरोधी कथना आधारे खालील प्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झाले. सदर प्रश्नांना मी माझे निष्कर्ष त्या

खाली दर्शविलेल्या कारणासह पुढील प्रमाणे देत आहे.

| | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| ०१ | वादीच्या हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय? | --- | नकारार्थी |
| ०२ | वादीचे बाजूने न्यायाचा समतोल आहे काय? | --- | नकारार्थी |
| ०३ | वादीने मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम मंजूर केले नाही तर वादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय? | --- | नकारार्थी |
| ०४ | आदेश काय? | --- | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्रमांक ०१ ते ०४ :**

**०५.** वादीचे वकील श्री. राजेश मेहेर व प्रतिवादीचे वकील श्री. के. डी. ठाकूर यांचा युक्तीवाद ऐकला. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ०१ व ०२ नुसार तात्पुरता मनाई हुकुम मंजूर करणेसाठी प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व मागणी केल्या प्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम मंजूर केले नाही तर कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान याबाबी प्रथमदर्शनी पुराव्यानिशी सिध्द करणे आवश्यक आहे. अर्थात, या सर्व बाबी सिध्द करण्याची प्राथमिक जबाबदारी वादीची असते. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे दावा मिळकती मध्ये अतिक्रमण करत आहे. तसेच त्यांनी त्यांच्या घराच्या दक्षिणेस असलेल्या शाळेचे शिपाई किसन यांनी दि.०१/०९/२०१८ रोजी यांनी वादीच्या घरी येवून त्यांना जिल्हा परिषेच्या शाळेच्या कुंपनाला लागून असलेल्या ३० फुट लांब व ५ फुट रुंद असलेल्या जागेच्या मोकळी पट्टी आम्हाला ८ दिवसांत न दिल्यास तुझे घर पाडून आम्ही तुला बाहेर काढु अशी धमकी दिली. अशाप्रकारे वादीस व त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या राहत्या घरातून बाहेर केल्यास वादीच्या हक्कांची पायमल्ली होणार आहे. व त्यांना भर पावसात बेघर व्हावे

लागणार आहे असे नमुद केले आहे. परंतु वादीनी या कथनाच्या पुष्ठार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. वादीनी दावा मिळकत ही त्यांच्या ताबेकब्जात असल्याबाबत पाणी पट्टीची पावती व विजबिल दाखल केले आहे. तसेच दावा मिळकतीचे फोटो दाखल केले आहे. गाव नमुना ८ अ दाखल केला आहे. परंतु या वरून वादींना प्रतिवादी घराबाहेर काढतील अथवा त्यांच्या जागेत अतिक्रमण करतील असे सिध्द होत नाही. तसेच वादीच्या वकीलांनी तोंडी युक्तीवाद करताना असे सांगितले आहे की, आता सदरच्या शाळेचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या पस्थितीचा विचार केला असता प्रतिवादीने वादीच्या जागेवर अतिक्रमण केले आहे. अथवा त्यांचे घर पाडण्याचे प्रयत्न केला आहे. असे कुठेही प्रथम दर्शनी दिसुन येत नाही.

वादीनी सदरचा अर्जमध्ये न्यायाचा समतोल हा त्याच्या बाजून आहे हे असे सिध्दकेले नाही. तसेच मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश करीत आहे.

## **आदेश**

वादीचा नि. क्र. ५ चा अर्ज नामंजूर केला जातो.

**(पी.एन.पठाडे)**
दिनांक: १७.०८.२०२१ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.